# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०८/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा पाचगाव येथे दि. २९/०८/२०२२ चे ००.३० वा. ते १०.३० वा. सुमारास बीएसएनल कंपनीच्या मोबाइल टॉवरला विदयुत पुरवठा करण्याकरीता लावण्यात आलेल्या २४ बॅटऱ्या कि. १४,४००/–रू. व टुजी बीटीएस हार्डवेअरच्या एकुण ६ नग कि. ६,०००/–रू. असा दोन्ही मिळुन २०,४००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय मधुकर मुरापे, वय ४२ वर्ष, रा. प्लॉट नं. ३२ झिंगाबाई टाकळी, नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नामदेव पुजारी मो.नं. ७७७५८११६१९ हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक २९/०८/२२ चे २०.०४ वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १७ वर्ष ही मैत्रीन सोबत कॉलेजला पायदळ जात असतांना आरोपी नामे– प्रणेश श्रीराम पुट्टेवार, वय ३० वर्ष, रा. कोलबास्वामी मठ वार्ड क्र. ३ कळमेश्वर याने गाडीने पाठलाग करून पाठी मागून येवून आवाज देवून थांबविले व म्हणाला की, ‘तुझे फोटो माझे मोबाईल मध्ये आहे, तुमची काही औकात नाही ते फोटो मी वायरल करून तुझी बदनामी करीन’ असे म्हणून धमकी दिली व तिच्या मनास लज्जा निमार्ण होईल असे कृत्य करून विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ ड, ५०६ भादंवी. सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गेडाम मो.नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा** – दिनांक २८/०८/२०२२ चे २१.३० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपी ने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री गिरोले मो क्र ९४०३७०१२६३ करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील बालाजी सेलीब्रेशन हॉल डुमरी शिवार येथे दिनांक २८/०८/२२ चे २३.०० वा ते २३.३० वा. सुमारास एमएच– ३४/एबी– २४४९ क्रमांकाचा कंटेनर ट्रकचा चालक आरोपीने आपले नादुरुस्त कंटेनर हे नागपुर जबलपुर हायवे वर कोणतेही चिन्ह व रिफ्लेक्टर न लावता उभा केल्याने एचआर– ३८/झेड– २२३४ क्रमांकाचा ट्रकच्या चालकास सदरचा ट्रक न दिसल्याने त्याने आरोपीचा कंटेनर क्र. एमएच– ३४ एबी– २४४९ ला मागुन धडक दिली. या अपघातात ट्रक क्र. एचआर– ३८/झेड– २२३४ चा चालक नामे– ज्ञानराम गोपाल सिंग, वय ३५ वर्ष, रा. कटरा पोस्टे डेरीया जि. प्रतापगड उत्तर प्रदेश हा गंभीर रित्या जखमी झाल्याने मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना प्रशांत रंगारी पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि कदम मो.नं. ७०८३७११९६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा पिपळा किनखेडे ता. कळमेश्वर येथे सुमारास **सौ. पुष्पा भाउराव राउत(मृतक) वय ५२ वर्ष, रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नागपूर** ही दि. २५/०८/२०२२ रोजी दुपारी १३. ०० वा. सुमारास तीचा पती आरोपी नामे– भाउराव उमरावजी राउत रा. ब्रम्हणवाडा ता. जि. नागपूर यांच्यासह त्यांच्या एम. एच– ३१/ईव्ही– ७८६६ क्रमांकाच्या मोटरसायकल वर मागे डबलसिट बसून आपले गावावरुन बसुन नांदीखेडा येथे रोडने जात असता आरोपीने आपले ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवून रोडवरील स्पीड ब्रेकर वर लक्ष न दिल्याने व सदर मोटरसायकल ब्रेकरवरुन उसळल्याने मागे बसलेली मृतक ही मोटरसायकल वरुन उसळुन खाली रोडवर पडली. त्यामुळे तिचा डोक्याला गंभीर मार लागल्याने उपचारादरम्यान मरण पावली. प्राप्त पी. एम चे कागदपत्रे वरुन तसेच सदर वाहन चालक आरोपी हा मृतक हिचे मरणास कारणीभुत झाल्याचे निष्पन होत असल्याने सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे मेडीकज पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री निशांत फुलेकर मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील सावनेर कळमेश्वर रोड धापेवाडा येथे दिनांक २९/०८/२०२२ चे ०२.३० वा सुमारास एमएच– ४०/बीएच– ०३८ क्रमांकाचा चालक मृतक नामे– विनायक गणपतराव धांडे, वय ६६ वर्ष, रा. हेटी सुरला हे सर्विस रोडवरून मोटरसायकल चालवित मेन रोडवर आले असता त्याच दरम्यान कळमेश्वर कडुन सावनेर कडे जाणारा आरजे– १४/जीके– ७०३७ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक अंदाजे १०० फुट पर्यंत फरफरटत नेवून जख्मीचे डोक्यावर तसेच दोन्ही हातापायावर गंभीर जख्मी झाल्याने मरण पावण्यास आरोपी कारणीभुत ठरला. फिर्यादीचे रिर्पोट व मेयो हॉस्पीटल नागपूर सुचनेवरून सदर गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दनोडे मो.क्र. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**